महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.५६९/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ५७५ दिनांक २०/ १०/ २०१८

**विषय :** म.रा.वि.वि.कं.मर्या. मधील कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ जानेवारी, २०१८ पासून सुधारीत दराने महागाई भत्ता देण्याबाबत.

**संदर्भ :** १) शासन निर्णय क्र. मभवा-२०१८/प्र.क्र. १८/सेवा-९ दिनांक १६.१०.२०१८.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५६९ दिनांक १७.०३.२०१८.

........

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितमधील कर्मचाऱ्यांसाठी सुधारीत दराने महागाई भत्ता मंजूर केला जातो.

२. आता वित्त विभाग, शासन निर्णय क्र. मभवा-२०१८/प्र.क्र.१८/सेवा-९ दिनांक १६.१०.२०१८ अन्वये महाराष्ट्र शासनाने, शासनाच्या सर्व पात्र पूर्णकालीक कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ जानेवारी, २०१८ पासून सुधारीत वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील (वेतनबँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय असलेला महागाई भत्याचा दर १३९% वरून १४२% केला आहे. तसेच सदर शासन निर्णयाद्वारे हा सुधारीत दर दि. ०१ ऑक्टोबर, २०१८ पासून देय करण्यात आला असून दिनांक ०१ जानेवारी, २०१८ ते ३० सप्टेंबर, २०१८ या कालावधीतील महागाई भत्याच्या थकबाकीच्या आहरणाबाबत शासनामार्फत स्वतंत्रपणे आदेश पारित करण्यात येणार आहेत.

३. आता शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं.मर्यादितमधील सर्व कर्मचाऱ्यांना देय असलेला महागाई भत्याचा दर १३९% ऐवजी १४२% असा दिनांक ०१ जानेवारी, २०१८ पासून सुधारीत करण्याकरीता मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (प्रकल्प), संचालक (संचलन) व संचालक (वाणिज्य) यांच्याशी विचारविनिमय करुन मंजुरी प्रदान केली आहे. या अनुषंगाने सदर सुधारीत महागाई भत्याचा दर दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१८ पासून लागू करण्यात यावा.

४. उपरोक्त सुधारीत दराने द्यावयाच्या दिनांक ०१ जानेवारी, २०१८ ते ३० सप्टेंबर, २०१८ या कालावधीतील महागाई भत्याच्या थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत शासन निर्णयानुसार स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

20/10

( संदेश हाके )
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

D:\data\F\ON D.A.& Draft, Oct 2018.doc